# कोरोना संकट व भारत

**श्री.संदीप शिवलिंग गाडे**

सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर.

..........................................................................................................................................

प्रत्येक व्यक्तीला ऐतिहासीक क्षण वा घटनेचे साक्षीदार होण्याची इच्छा असते. मग तो छत्रपती शिवाजी महाराजाचा राज्याभिषेक सोहळा असो वा महात्मा गांधीचा मीठाचा सत्याग्रह, डॉ. आंबेडकर याचा मनुस्मृती दहनाचा कार्यक्रम असो 15 ऑगस्ट 1947 चा स्वातंत्र्य मिळाल्याचा क्षण असो. दुर्देवाने आज आपण इच्छा नसताना सुद्धा अशा ऐतिहासीक घटनेचे साक्षीदार होत आहोत. करोना वा COVID–19 ह्या जागतिक साथीच्या रोगा मुळे भारता पुढे आरोग्यविषयक,सामाजिक , आर्थिक व राजकीय समस्या निर्माण झाल्या आहेत. अजून हे संकट संपलेले नाही,किंबहुना हे संकट कधी संपनार या बद्दल निश्चित सांगता येत नाही.पंजाब चे मुख्यमंत्री श्री.अमरींदर सिंग म्हणतात की ही साथ सप्टेंबर २० पर्यत सर्वोच्च बिंदू पर्यत पोहोचलेली असेल. भारतातील 58 % लोकसंख्या करोना बाधित झाली असेल.[१] आटोक्यात येईल,तर हॉवर्ड विद्यापीठाच्या संशोधकाच्या मॉडेल नुसार अमेरिकेतील लोकांना २०२२ पर्यत सोशल डिसटनसिंग पाळावे लागेल[२]. अशा परिस्थितीत आपणाला या साथीच्या रोगामुळे होणाऱ्या तात्कालीन व दीर्घकालीन परीणामा बद्दल विचार करावाच लागेल.

प्रत्येक संकट एक संधी घेऊन येते. कोरोना मुळे आपल्याला अशी संधी मिळाली आहे, आपले,देशाचे प्राधान्यक्रम काय असावेत या बद्दल गभीरपणे विचार करण्याची आवश्यकता आहे. अन्न,वस्त्र,निवारा, आरोग्य व शिक्षण ह्या व्यक्तीच्या मुलभूत गरजा मानल्या जातात.हरितक्रांतीमुळे आपण अन्नाची ही गरज भागवू शकतो. वस्त्र व निवारा ह्या गोष्टी आपण पुरवू शकतो आहोत. आरोग्याच्या बाबतीत मात्र आपणाला खूप काही करता येण्यासारखे आहे.'भारत सरकारच्या एका अहवालानुसार बाह्यरुग्ण तपासणीतील 78% रुग्ण खाजगी क्षेत्रात तर 22% रुग्ण सरकारी क्षेत्रात तपासले जातात. भारत सरकार आरोग्य क्षेत्रातएकूण ळक्च्च्या फक्त 1 % एवढे पैसे गुंतविते. जाणकाराच्या मतानुसार किमान 2.5% एवढे पैसे गुंतविणे आवश्क आहे.सरकारच्या ह्या कमी गुंतवणुकी मुळे भारतातदरवर्षी किमान पाच कोटी नागरिक दारिद्रय रेषे खाली ढकलले जातात'३. भारतात इंटरनेट चा वापर हा मुलभूत हक्क मानला गेला आहे [4] पण आरोग्यसेवा हा मुलभूतहक्क मानला गेला नाही. ह्या पार्श्वभूमीवर आपण भारतातील करोनाच्या साथी मुळे उद्भवलेले वा समोर आणलेले प्रश्न व त्याला भारताने दिलेला प्रतिसाद पाहणे उद्बबोधक ठरेल.

डिसेंबर 19 मध्ये चीन मध्ये प्रथम करोनाचा रुग्ण आढळून आला.सुरवातीला निमोनिया वाटणारा हा रोग भलताच आहे व तो माणसापासून माणसापर्यत वाहून नेला जाऊ शकतोहे लक्षात यायला किवा मान्य करायला चीनला २३ जानेवारी २० उजाडावा लागला.[5] या कालावधीत चीनने महत्वाची माहिती लपवून तरी ठेवली किवा दाबून तरी टाकली. पण शेवटी ( जागतिक आरोग्य संघटना)च्या तज्ञांनी जानेवारी २० मध्ये चीनचा दौरा करून आपला अहवाल प्रसिद्ध केल्या नंतर चीनने हा वेगळा रोग आहे हे मान्य केले.ब्वतवदंअपतने ह्या प्रकारातील हा 2019 मध्ये सापडला हा नवीन विषाणू आहे म्हणून ह्याचे नाव COVID–19 असे ठेवण्यात आले.

३० जानेवारी २०२० ला जागतिक आरोग्य संघटनेणे ही जागतिक साथ आहे असे जाहीर केले.[६] ३० जानेवारी २०२०ला भारतात पहिला रुग्ण केरळमधील त्रिचूर मध्ये सापडला[७].ही केरळमधील विध्यार्थिनी होती जी चीन मधील वूहान शहरात डॉक्टर होण्याचे शिक्षण घेत होती.आज अखेर भारतात 69293 एवढे रुग्ण आहेत. ज्यापेकी 17847 जण पूर्ण बरे झालेत व 1981 जनाचा मृत्यू झाला आहे.[8]

अमेरिका व युरोपच्या तुलनेत भारतात रुग्ण संख्या कमी दिसत असली तरी भारताच्या प्रतिसादाबद्दल काही प्रश्न उभे राहतात.काही देश शास्त्रीय संशोधना च्या आधारे तर काही देश व्यवस्थापन तंत्राचा वापर करून यारोगाला तोंड देण्याचा प्रयत्न करीत असताना भारतात मात्र धोरण हीन धडाडी व व्यक्तिमत्वाच्या प्रभावा खाली या रोगाला सामना करण्याचा प्रयत्न होताना दिसत आहे. ज्या मुळे भारतात हा रोग वेगाने बळवताना दिसत आहे.

तैवान सारख्या देशाने २० जानेवारी २०२० रोजी आपल्या देशात केंद्रीय साथ रोग प्रतिबंध विभागाची उभारणीकेली.[9]

भारतात पहिला करोना रुग्ण ३० जानेवारीला आढळून आला होता. ७ फेब्रुवारी २०२० ला मा.राहुल गांधी यांनी या बाबत भारत सरकारला इशारासुद्धा दिला होता.१० मात्र सरकारने त्याची योग्यती दखल घेतली नाही.सरकार तर्फे सर्व काही ठीक असल्याचे सांगीतले जात होते.काही प्रसारमाध्यमे व ज्लपाकांना (Trols)ना हाथाशी धरून त्यांची खिल्ली उडवली जात होती. जागतिक आरोग्य संघटनेने करोनाला जागतिक साथीचा रोग जाहीर करून सुद्धा,हा एका माणसापासून दुसर्‍या माणसांना होऊ शकतो हे माहित असताना सुद्धा स्वतःमा.पंतप्रधान नरेंद्र मोदी लाख लोकाचे जाहीर मेळावे घेत होते. 15 मार्च पर्यत भारतातील सर्व धर्मीय प्रार्थनास्थळे खुली होती. फक्त परदेशातून येणाऱ्या लोकांची चाचणी केली जात होती. यामुळेच वेळेवर रोगाला अटकाव करण्याची संधी भारताने गमावली.

सुरवातीला 22 मार्चला मा.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनता कर्फ्यू जाहीर केला, लोकांनीही त्याला उत्तम प्रतिसाद दिला.पण भारतासारख्या खंडप्राय देशात कोणतीही चर्चा विरोधीपक्षा बरोबर वा राज्यसरकारा बरोबर नकरता २४ मार्चला देशव्यापी लॅाकडाऊन जाहीर केला. तो जाहीर करीत असताना करोना हरविण्यासाठी हे आवश्यक आहे असे जोरदार समर्थन केले होते. तसेच यामुळे करोना आटोक्यात येईल असेही सांगीतले.

खरेतर आरोग्य हा राज्यसुचीतील विषय आहे.जरी करोना ही जागतिक साथ असली तरी या बाबत राज्यसरकाराना, विरोधीपक्ष यांना विश्वासात घ्यायला हवे होते.पण तसे न करता धोरणहीन धडाडी दाखवत लॅाकडाऊन जाहीर केला.

या साथीच्या रोगाला युद्धाचे स्वरूप देवून राष्ट्रवादी भावनांना आवाहन केले. साहजिकच त्यांना हवे तसे वातावरण तयार झाले. साथीच्या रोगाला कसे तोंड द्यायचे ,काय आरोग्यविषयक नियम पाळायचे,भारताची तयारी काय आहे,आपल्याला कशाकशाची आवश्यकता आहे व काय टाळायला हवे याची कोणतीही चर्चा न होता याला इलेक्ट्रॅानिक माध्यमे व समाज माध्यमे यांनी हिंदू–मुस्लिम स्वरूप दिले.साहजिकच त्यामुळे जमातवाद फोफाविण्यास मदत झाली.यामुळे द्वेषाधारित गुन्हे वाढू लागले. निरपराध मुस्लिमांना त्रास देणे वाढू लागले.जेव्हा याची दखल मध्यपूर्वेतील अरब राष्ट्रात घेतली जाऊ लागली तेव्हा स्वतःमा.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना ट्वीटर द्वारे लोकांना संयम पाळण्याचे आवाहन करावे लागले.

मा.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची लोकप्रियता टाळ्या वाजवा,दिवे मालवून मेणबत्ती लावा या कार्यक्रमात सुद्धा दिसून आली.याचा कळस भारतीय सैन्यदलाकडून कोरोना वॅारीयर्सना मानवंदना देण्यास सांगण्यात आले.अजूनही कोरोना संकट संपलेले नाही पण सैन्य दला वापर करून अकारण राष्ट्रवादी भावना चेतविण्याचा प्रयत्न होताना दिसतो आहे.

२४ मार्चला देशव्यापी लॅाकडाऊन जाहीर करीत असताना सामान्य गरीब मजुरांचे काय होणार ते कोणत्या परीस्थीतीत दिवश काढतील याचा कोणताही पुर्व विचार करण्यात आला नाही. जेव्हा २१ दिवसाच्या देशव्यापी लॅाकडाऊन नंतरही कोरोना रुग्णसंख्या कमी होण्या ऐवजी जास्त होऊ लागली तेव्हा परत देशव्यापी लॅाकडाऊन वाढविण्यात आला,कारण भारत सरकारकडे या महामारीशी लढण्यासाठी कल्पक योजनांचा आभाव आहे.या लॅाकडाऊन ला कंटाळून जेव्हा मजुरीची आदोलने होऊ लागली तेव्हा काही प्रमाणात रेल्वे गाड्या सुरु करण्यात आल्या.मात्र आत्ता भाजप शाशित राज्यांनी मजुराना घेऊन जाणारया गाड्या रद्द करण्याची विनंती केली आहे.

लॅाकडाऊन कालावधीत दारू दुकाने बंद ठेवावीत की उघडी याच्या वरून पण धोरणात्मक निर्णयांचा आभाव दिसून येतो.कोरोना रुग्णसंख्या कमी असताना बंद असलेली दारू दुकाने कोरोना रुग्णसंख्या वाढल्यावर उघडी कशी केली गेली यांचे कोणतेही पटणारे उत्तर मोदी सरकारकडे नाही. करोनाशी प्रामुख्याने राज्यसरकारे तोड देत असताना केद्र सरकार मात्र निव्वळ अधिकार गाजविताना दिसत आहे.राज्याची GST ची थकबाकीची रक्कम अजूनही दिलीगेलेली नाही.

कोरोनाला हरविण्यासाठी म्हणून तयार करण्यात आलेल्या आरोग्यसेतू ह्या ॲपची सूत्रे आरोग्य खात्या ऐवजी गृह खात्यकडे कशी? हे ॲप डाऊनलोड करण्याची सक्ती कशासाठी?[१०] अशा अनेक प्रश्नाची उत्तरे आपल्याला मिळत नाहीत.

शेवटी निष्कर्ष असा काढता येतो की केवळ पंतप्रधान आपल्या व्यक्तिमत्वाच्या प्रभावाखाली, धोरणहीन धडाडी,मथळे बदलणारी सशक्त यंत्रणा या जोरावर कोरोनाला तोड देण्याचा प्रयन्त करीत आहेत.थोडक्यात कोरोनाला लवकरात लवकरसंपविण्याची आपली बस मात्र आधीच चुकली आहे.

संदर्भसूची

१) https://m.economictimes.com/news/politics-and-nation/experts-told-that-coronavirus-will-peak-in-mid-september-in-india-punjab-cm-amarinder-singh/videoshow/.75085729cms १० एप्रिल २०२०
२) https://m.economictimes.com/news/international/world-news/us-may-need-to-extend-social-distancing-for-virus-until--2022study-says/articleshow/.75154041cms १५एप्रिल २०२०
३) दैनिक सकाळ १६ एप्रिल २०२०
४) https://www.thehindubusinessline.com/news/right-to-access-internet-is-a-fundamental-right-rules-supreme-court/article.30531490ece १० जानेवारी २०२०
५) https://www.aljazeera.com/news//01/2020timeline-china-coronavirus-spread-.200126061554884html.
६) https://www.who.int/emergencies/diseases/novel-coronavirus-/2019events-as-they-happen
७) https://www.indiatoday.in/india/story/kerala-reports-first-confirmed-novel-coronavirus-case-in-india-30-01-2020-1641593
८) https://g.co/kgs/FytUk6 ८ मे२०२०
९) https://thediplomat.com//04/2020how-taiwan-battles-the-coronavirus/ दिएप्रिल ०६. २०२०
१०) https://www.theweek.in/news/india//03/05/2020as-centre-mandates-download-of-aarogya-setu-app-a-debate-ensues-on-privacy-concerns.html दि०३. मे २०२०